परतुनी आलास जर का...

ती- परतुनी आलास जर का गीत ते घेऊनी ये
तो- दाटले माझ्या मनी जे रूप ते घेऊनी ये.

ती- चूल इवली लुटुपुटूची
डाव कितिदा रंगले
रुसुनी बसली बाहुली बघ
कोण तिज रागावले
मोरपंखी गत दिसांचे रंग शत खुलवीत ये...

तो- चोरभेटी चांदण्यांतिल
प्रीत नवथर लाजली
कवळिता तुजला जवळ मी
रातराणी हासली
धुंद आतुर यौवनाचे साज ते घेऊनी ये...

ती- आसवांचे पूर सरले
नेत्र आता कोरडे
तो- दुःख मजला विटुनी गेले
दूर निघुनी बापुडे
ती- वाट बघते अजुनी राधा श्याम घन होऊनी ये...

– डॉ. कुंदा जोशी
('फेनफुले' या कवितासंग्रहातून)